मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२


www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 8 ऑक्टोबर 2024 | पान- 1

# पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्ष पदी योगेश बहल यांची निवड

## अजित पवार यांच्या उपस्थितीत योगेश बहल यांची शहराध्यक्षपदी निवड : योगेश बहल यांच्या निवडीनंतर पक्षाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी आनंद व्यक्त केला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या शहराध्यक्षपदी माजी महापौर योगेश योगेश बहल यांची आज निवड करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी अजित गव्हाणे यांनी पक्षाचा राजीनामा देत शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. तेव्हापासून शहराध्यक्ष पद रिक्त होते. दरम्यान आज अजित पवार यांच्या उपस्थितीत योगेश बहल



यांची शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली. बहल यांच्या निवडीनंतर पक्षाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी आनंद व्यक्त केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा अजितदादा पवार यांनी आज पिंपरी चिंचवड शहरातील माजी नगरसेवक व पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीत अध्यक्षपदाचा मुद्दा चर्चेत आल्यानंतर सर्वानुमाते योगेश बहल यांची शहराध्यक्षपदी निवड जाहीर करण्यात आली आहे.

योगेश बहल हे राष्ट्रवादीचे निष्ठावंत व अजितदादा यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. त्यांनी यापूर्वी पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर पद भूषविलेले आहे. आगामी विधानसभा निवडणूक आणि महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर योगेश बहल यांची निवड महत्वपूर्ण मानली जात आहे.

# चिंचवडमध्ये भाजपचाच विजय'; विजय शिंदे यांची बॅनरबाजी चर्चेत

## होर्डिंगची शहरात नव्याने चर्चा जोरदार सुरु झाली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीचे बिगुल केव्हाही वाजणार आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमधून अनेक जण इच्छुक आहेत. विधानसभेसाठी शहरातील तिन्ही विधानसभा मतदारसंघात मोठी राजकीय उलथापालत होताना दिसत आहे. सर्वाधिक मोठा मतदारसंघ असणाऱ्या चिंचवड मतदारसंघात भाजपचे निष्ठावान असणारे नगरसेवक शितल उर्फ विजय शिंदे यांनी लावलेल्या एकनिष्ठ पक्षाचा निर्धार विजयाचा... होर्डिंगची शहरात नव्याने चर्चा जोरदार सुरू झाली आहे. भाजपचा बालेकिल्ला असणाऱ्या "चिंचवडमध्ये भाजपचाच विजय" य वाक्याने चिंचवड विधानसभेत भाजप नवीन चेहऱ्याला संधी देणार का? अशा चर्चाना वेग आला आहे.

पक्षाशी आणि आपल्या विचारांशी समरूप असणारा स्वच्छ चारित्र्याचा चेहरा मैदानात उतरवणार असे वातावरण दिसत आहे.

राज्यात महायुती सरकार सत्तेत असल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील पदाधिकारी यांनीही या मतदारसंघावर दावा केला आहे. परंतु ज्यांचा आमदार त्या पक्षाला ठिकाणी जागा मिळणार असल्याने चिंचवडमध्ये महायुतीचा उमेदवार भाजपचाच असणार आहे. सर्व इच्छुकांमधील पार्श्वभूमी पाहता चिंचवड



विधानसभेसाठी भाजप स्वच्छ चारित्र्याचा व भाजपच्या कुशीत तयार झालेला उमेदवार देईल आणि तो सर्व इच्छुकांना मान्य करावा लागणार आहे.

भाजप धक्का तंत्र वापरत आरएसएसच्या कुशीतील शितल उर्फ विजय शिंदे यांना उमेदवारी देऊन सर्वांना धक्का देऊ शकतात अशीही चर्चा सुरू झाली

### पक्ष तोच चेहरा नवीन....

»चिंचवड विधानसभा मतदारसंघात भाजपकडून विद्यमान आमदारासह, शहराध्यक्ष, माजी नगरसेवक आणि भाजपमधील विशेषतः राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) यांच्या मुशीत तयार झालेले नेतृत्व इच्छुक आहेत. चिंचवड विधानसभा मतदारसंघात 2014 पासून सलग तीन आमदार निवडून येत अबाधितपणे भाजपचे कमळ फुलले आहे. घराणेशाहीला भाजपच्या अनेक नगरसेवकांनी विरोध केला आहे. दहा ते पंधरा नगरसेवकांचा वेगळा गट तयार होऊन प्रसंगी बंडाच्या पवित्र्यात आहे. यामुळे भाजप व आरएसएस कडून चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी उमेदवारी देताना नवीन चेहरा देण्याच्या हालचाली सुरू केल्या असल्याचे चर्चांना जोर असताना शितल उर्फ विजय शिंदे यांच्या नव्याने पलेक्सबाजीमुळे एकनिष्ठ पक्षनिष्ठ नेतृत्वासाठी काही घडामोडी सुरू आहेत असे दिसते

### चिंचवडला हवा पक्षनिष्ठ आमदार...

»चिंचवड विधानभेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा मोठा प्रभाव आहे. भाजपला मानणारा मतदार मोठ्या प्रमाणावर असल्याने आगामी विधानसभा निवडणुकीत संघाच्या विचाराचा आमदार चिंचवडसाठी हवा आहे अशी चर्चांना जोर धरला आहे. विद्यमान आमदारसह शहराध्यक्ष व अनेक माजी नगरसेवकांनी उमेदवारी मागितली आहे. सर्व इच्छुकांची पार्श्वभूमी पाहिली असता चिंचवड मधील एकमेव शितल उर्फ विजय शिंदे यांची राजकीय सुरुवात आरएसएस विचारधारेपासून झाल्याची दिसते. 2014 पासून चिंचवड विधानसभेवर भाजपचे कमळ फुलले आहे. इच्छुकांच्या भाऊ गर्दीत मतदारसंघ हातातून जाऊ नये. यासाठी आरएसएस स्वतः पक्षाशी आणि आपल्या विचारांशी समरूप असणारा स्वच्छ चारित्र्याचा चेहरा मैदानात उतरवणार असे वातावरण दिसत आहे.

# नदीप्रदूषणावर येणार 'नियंत्रण' 'पीएमआरडीए'चा प्रकल्प

## एक हजार 967 कोटींच्या खर्चाला मंजुरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंद्रायणी, पवना व मुळा-मुठा नदीच्या वाढत्या प्रदूषणाला नियंत्रण घालण्यासाठी 'पीएमआरडीए' प्रशासनाने पावले टाकली आहेत. त्यासाठी नदी प्रदूषण नियंत्रण प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालय व राज्य सरकारकडून सुमारे एक हजार ९६७ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे नदी प्रदूषण रोखण्याच्या कामांना आता गती मिळणार आहे.

इंद्रायणी, पवना आणि मुळा-मुठा नदी प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शासनाकडून सातत्याने उपाययोजना करून प्रदूषणावर तोडगा काढला जात आहे. पीएमआरडीएच्यावतीने देखील हद्दीतील नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी पुढाकार घेतला आहे. नदी प्रदूषण नियंत्रण प्रकल्पाद्वारे विविध उपाययोजना राबविल्या जाणार आहेत. यामध्ये आवश्यक ठिकाणी मलनिस्सारण केंद्र (एसटीपी) उभारले जाणार आहेत. अनेक ठिकाणी दूषित पाणी नाल्याद्वारे नदीत मिसळत आहे. यासाठी नाल्यांचे प्रदूषित पाणी एकत्रित संकलन करण्यासाठी मलवाहिन्या टाकण्यात येणार आहे. तसेच जलपर्णी निर्मुलन आणि घन कचरा व्यवस्थापनासारख्या उपाययोजना राबविल्या जाणार आहेत.

इंद्रायणी नदी प्रदूषणाबाबत केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयांतर्गत एनआरसीडीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला




होता. डीपीआर तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले होते. सल्लागार नेमणुकीची प्रक्रिया प्रगतिपथावर होती. या कामांसाठी दोन हजार कोटी रुपयांपर्यंत खर्च अपेक्षित होता. निधीला मान्यता न मिळाल्याने ही कामे कागदावरच प्रस्तावित होती. नुकतीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत अर्थसंकल्पाला मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे आता ही कामे देखील मार्गी लागणार आहेत.

### केंद्र व राज्य सरकारकडून निधी

»नदी प्रदूषण रोखण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांसाठी केंद्र सरकारच्या राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालयाकडून तसेच राज्य सरकारकडून निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. ६० आणि ४० टक्के अशी निधीची तरतूद दोन्ही शासनाकडून होणार आहे. प्रशासकीय मान्यतेसाठी हा विषय प्रलंबित होता. आता दोन्ही विभागाकडून निधीची पूर्तता होणार आहे.

### कामाची स्थिती -

» इंद्रायणी १०५ ७९३ केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयांतर्गत एनआरसीडीकडे प्रस्ताव सादर.
»नपवना ३५ ११७ डीपीआर तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात.
»नमुळा-मुठा १०७ ९७७ सल्लागार नेमणुकीची प्रक्रिया प्रगतिपथावर.

"राज्य सरकारकडून विविध कामांसाठी निधीची मंजुरी मिळाली आहे. नदी प्रदूषण रोखण्यासाठी पीएमआरडीए देखील कार्यवाही करत आहे. इंद्रायणी, पवना आणि मुळा-मुठा नदी प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

- योगेश म्हसे, आयुक्त. पीएमआरडीए..

# खड्ड्यांची माहिती देणारे ॲप हितसंबंधांमध्ये अडखळले?

## पारदर्शक कारभार अडचणीचा असल्याने पथ विभागाचे मोबाईल ॲप रेंगाळले असल्याचा आरोप पुणेकर करत आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

रस्त्यावरील खड्डयांची सविस्तर माहिती देणारे मोबाईल ॲप तयार केले जाणार होते. त्यामुळे रस्त्याची नेमकी माहिती पुणेकरांना उपलब्ध होणार होती. असा पारदर्शक कारभार अडचणीचा असल्याने पथ विभागाचे मोबाईल ॲप रेंगाळले असल्याचा आरोप पुणेकर करत आहेत.

रस्त्यांवरील खड्डयांमुळे पुणेकरांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. अनेकांचा खड्डयात पडून मृत्यू झाला. त्यानंतरही महापालिकेला जाग आली नाही. रस्त्यावरील खड्डयांची माहिती तत्काळ कळण्यासाठी, ठेकेदारांना तत्काळ परवाना देण्यासह नागरिकांना तक्रार करणे सुलभ व्हावे आणि प्रशासनाचा कारभार गतिमान व्हावा यासाठी मोबाईल ॲप विकसित केले जाणार होते. या ॲपमुळे ठेकेदाराने केलेल्या कामाची माहिती, तसेच रस्त्यावर किती दिवसात खड्डे पडले, याची माहिती समजणार होती. याचा मोठा फायदा पावसाळ्यात झाला असता. मात्र, पथ विभाग आणि माहिती तंत्रज्ञान विभागाकडून (आयटी) हे ॲप तयार केले गेले नाही. हे ॲप दिलेल्या वेळेत तयार व्हावे, यासाठी पालिकेच्या आयटी विभागाकडे पथ विभागाने पाठपुरावाही केला नाही. पथ विभागाच्या प्रस्तावानुसार ॲप विकसित करण्यासाठी आयुक्तांनी मे महिन्यातच परवानगी दिली आहे. तसेच त्यासाठी सुमारे ४० लाख रुपयांचा निधीही मंजूर केला आहे. त्यानुसार पथ विभागाने माहिती तंत्रज्ञान विभागाला मोबाईल ॲप तयार करण्याचे पत्रही मे महिन्यात दिले आहे. हे ॲप १५ ते एक महिन्यात विकसित केले जाईल, अशी माहिती दिली होती. हे ॲप जर जून महिन्यात आले असते, तर पावसामुळे पडलेल्या खड्डयांची सविस्तर माहिती पालिकेला समजली असती. त्यामुळे ठेकेदाराने केलेल्या कामांचे पितळ उघडे पडले असते. पथ विभाग आणि माहिती तंत्रज्ञान विभागाच्या उदासीन कारभारामुळे अद्याप ॲप तयार करण्याची प्रक्रियाही सुरू झाली नसल्याची माहिती समोर आली आहे. हे ॲप तयार होऊ नये यामागे प्रशासनाची भूमिका संशयास्पद असल्याचे बोलले जात आहे.

पथ विभागाने १५ मे रोजी प्रस्ताव तयार करत रस्ते विकास व डागडुजी संदर्भात महत्त्वाचे पाऊल उचलले. मान्सून दाखल होण्यापूर्वी रस्त्यावरील खड्डे व डागडुजी करणे गरजेचे होते. त्यासाठी बांधकाम ठेकेदारांना तत्काळ परवानगी देणे, नागरिकांच्या तक्रारीसंदर्भात उपाययोजना करण्यासाठी अद्ययावत ॲपची विभागास गरज होती. रस्ते बांधणी, दुरुस्ती, विकासासंदर्भातील सर्व माहितीसाठी ॲप उपयुक्त होते.




### कामामध्ये गतिमानता व सुधारणा आवश्यक

» सध्या पथ विभागामार्फत खोदकामाची लेखी (मॅन्युअली) परवानगी दिली जाते. ही पद्धत क्लिष्ट असून त्यात वेळ जात होता. त्यामुळे कामामध्ये गतिमानता व सुधारणा आवश्यक आहे. हा विषय अतिरिक्त महापालिका आयुक्त ( जनरल ) यांच्यासोबतच्या चर्चेत उपस्थित झाला असता त्यांनी ॲप त्वरित करण्याचे आदेश दिले. तसे पत्र पथ विभागाने आयटी विभागाला दिले. आता आयटी विभागाने या पत्राला केराची टोपली दाखवली असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. या बाबत पथ आणि आयटी विभागाशी संपर्क साधला असता प्रतिसाद मिळाला नाही.

### ॲपचा फायदा काय?

- » प्रशासनाची गतिमानता वाढेल
- » रस्त्याची जबाबदारी निश्चित होणार
- » तीन वर्षांच्या आत खड्डे पडल्यास ठेकेदार, अधिकारी जबाबदार
- » कोणता रस्ता खोदला किंवा खोदणार याची ऑनलाईन माहिती मिळणार
- » रस्त्यांवरील खड्डयांची माहिती मिळणार

**“ पथ विभागाने आयटी विभागाला मोबाईल ॲप तयार करण्याचे पत्र दिले आहे. मात्र ते रखडले आहे. पाठपुरावा केला जात आहे. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता, व्हीआयपी दौरे, आता विधानसभेमुळे लागणारी आचारसंहिता यामुळे मोबाईल ॲप सध्या तयार होणे अवघड आहे.**

**- अनिरुध्द पावसकर, प्रमुख, पथविभाग, पुणे महापालिका.**

# ‘कसब्या’साठी खासदारांचा जनसंपर्क

## भारतीय जनता पक्षाने कसबा विधानसभा मतदारसंघावर लक्ष्य केंद्रीत केले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

बालेकिल्ल्यातील पोटनिवडणुकीतील पराभवामुळे सावध झालेल्या भारतीय जनता पक्षाने कसबा विधानसभा मतदारसंघावर लक्ष्य केंद्रीत केले आहे. त्याअंतर्गत ‘खासदार जनसंपर्क सेवा अभियाना’अंतर्गत दुसरा कार्यक्रम कसबा विधानसभा मतदारसंघात घेण्यात आला. कसबा मतदारसंघाची जबाबदारी असलेले केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी या उपक्रमाअंतर्गत नागरिकांच्या अडचणी समजून घेतल्या.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने भाजपने शहरातील आठही विधानसभा मतदारसंघात नियमितपणे भेट देऊन नागरिकांच्या समस्या समजून त्या सोडविण्यावर भर दिला आहे. या उपक्रमाला ‘खासदार जनसंपर्क सेवा अभियान’ असे नाव देण्यात आले आहे. त्याअंतर्गत कसबा मतदारसंघात दुसरा कार्यक्रम रविवारी झाला. केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाला शहराध्यक्ष धीरज घाटे, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष हेमंत रासने आणि कसबा विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष राजेंद्र काकडे उपस्थित होते.



दीड वर्षांपूर्वी झालेल्या कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपला बालेकिल्ल्यातच पराभूत व्हावे लागले होते. या पोटनिवडणुकीत काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी विजय मिळविला होता. त्यानंतर सावध झालेल्या भाजपने कसबा मतदारसंघावर यापूर्वीच लक्ष्य केंद्रीत केले आहे. नागरिकांच्या सातत्याने भेटी गाठींना प्राधान्य देण्यात येत असून नागरिकांच्या अडचणीसंदर्भात महापालिकेच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठकाही घेतल्या जात आहेत. त्याअंतर्गत रविवारी या उपक्रमाच्या माध्यमातूनही नागरिकांच्या अडचणी समजून घेण्यात आल्या.

टपाल कार्यालयाच्या विविध योजना, तहसील कार्यालय, पॅनकार्ड-पासपोर्ट-शॉपअॅक्ट-उद्यम आधार विभाग, पंतप्रधान विश्वकर्मा विभाग, पंतप्रधान अन्नसुरक्षा, रेशनकार्ड, नगरभूमापन, समाजविकास अंतर्गत दिव्यांगांसाठी विविध योजना, पंतप्रधान आयुष्मान कार्ड विभाग, शहरी गरीब आणि मतदार नोंदणी अशा विविध केंद्र, राज्य शासनाच्या योजनांचे स्टॉल या वेळी लावण्यात आले होते. नागरिक नावनोंदणी करून आपले काम असलेल्या स्टॉलकडे जाऊन माहिती घेत होते. महापालिका, राज्य शासनाच्या विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी, पोलीस खात्याचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# शरद पवारांकडून हर्षवर्धन पाटलांना मंत्रीपदाचे संकेत

## हर्षवर्धन पाटील यांच्यामुळे इंदापूरमधील ही पोकळी भरुन निघेल.

**पिंपरी | प्रतिनिधी**

भाजप नेते आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी आपली कन्या अंकिता पाटील आणि कार्यकर्त्यांसह इंदापूरमध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमात शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी व्यासपीठावर विजयसिंह मोहिते-पाटील , धैर्यशील मोहिते पाटील, सुप्रिया सुळे, जयंत पाटील, अमोल कोल्हे, उत्तमराव जानकर अशा बड्या नेत्यांची हजेरी होती. या कार्यक्रमात बोलताना सुरुवातीलच हर्षवर्धन पाटलांनी लोकसभा निवडणुकीत आपण सुप्रिया सुळेंसाठी गुपितपणे काम केल्याचं त्यांनी म्हटलं. तर, शरद पवारांनीही हर्षवर्धन पाटील यांच्यावर स्तुतीसुमने उधळत ते बारामतीचेच जावई आहेत, आम्ही कुणालीही आमच्या मुली देत नाहीत, असेही त्यांनी म्हटलं. यावेळी, इंदापूरच्या जनतेला आवाहन करताना, तुम्ही विधानसभेत पाठवा, राज्याची जबाबदारी द्यायचं काम माझं, असे म्हणत हर्षवर्धन पाटील यांना मंत्रीपदाचे संकेत दिले आहेत.



शरद पवारांनी आपल्या भाषणातून हर्षवर्धन पाटील व सहकार क्षेत्रावर भाष्य केलं. हर्षवर्धन पाटील यांच्यामुळे इंदापूरमधील ही पोकळी भरून निघेल, हर्षवर्धन पाटील आणि आमचा पक्ष वेगळा होता. पण, धोरणात कधी मतभेद नव्हते. जेव्हा नवीन काही करायचे असेल आणि जबाबदारी द्यायची असेल तर हर्षवर्धन यांचे नाव पहिलं यायचं. साखर कारखान्या संदर्भात ज्यावेळेस अडचण यायची त्यावेळेस मी हक्काने सांगायचो की हर्षवर्धन आपला माणूस आहे, तिथं पक्ष वेगळा असला तरी देखील. हर्षवर्धन पाटील यांच्याकडे बघून मला सारखं वाटायचं हा रस्ता चुकला. भाऊंनी आपल्याला दाखवले तेच आपलं घर, निर्णय घ्यायला वेळ लागला पण निर्णय घेतला. हा फक्त इंदापूर पुरता मर्यादित नाही, परंतु साखर व्यवसायाला चांगला दिवस आणणारा निर्णय असल्याचेही शरद पवार यांनी म्हटले.

महाराष्ट्राचा चेहरा बदलायचा आहे. हर्षवर्धन पाटील यांना विधानसभेमध्ये पाठवायचे तुमचं काम, राज्याची जबाबदारी काय द्यायचं ही माझी जबाबदार, असे म्हणत महाविकास आघाडीचं सरकार आल्यास मंत्रिपदाचे संकेतही शरद पवारांनी दिले आहेत. लोकं मला विचारत होते, कसं होणार, काय?, पण मी म्हटलं, काही काळजी करू नका, जावई कुणाचाय?, शरद पवारांनी असं म्हणतात कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. तसेच, आम्ही चांगलं घर बघूनच मुलींना देत असतो, त्यामुळे घर आम्हाला चांगलं मिळालंय, संसार नीट करणारा, महाराष्ट्राचा संसार नीट सांभाळणारा हा जावई आहे, जो बारामतीकरांनी तेव्हाच पाहिला होता, असे म्हणत शरद पवारांनी हर्षवर्धन पाटील यांच्यावर स्तुतीसुमने उधळली आहेत.

# भोसरी मतदारसंघात भाजपाची संघटनात्मक मोर्चेबांधणी

## निगडी चिखली मंडल पदाधिकाऱ्यांची नियुक्ती : पक्ष संघटन मजबूत करण्याच्या कार्यकर्त्यांना सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भोसरी विधानसभा मतदारसंघांमध्ये भाजपाने 'मायक्रो प्लानिंग' सुरू केले आहे. त्याचाच एक भाग म्हणजे मंडल पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात येत आहेत. भोसरी विधानसभा मतदारसंघात भाजपाची संघटनात्मक मोर्चेबांधणी सुरू असून, रविवारी (दि.०६) निगडी चिखली मंडल पदाधिकाऱ्यांना भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देण्यात आले.



आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरामध्ये शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या पुढाकाराने संघटनात्मक मोर्चेबांधणी करून या संघटनाच्या माध्यमातून निवडणुकांना सामोरे जाण्याचे भाजपाचे धोरण आहे. त्यानुसार रविवारी आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते निगडी चिखली मंडल पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी भोसरी विधानसभा विस्तारक दीपक रजपूत, सरचिटणीस अजय पाताडे, माजी नगरसेवक उत्तम केंदळे, कमलताई घोलप, योगिता नागरगोजे, सुरेश म्हेत्रे, दिनेश यादव, पांडुरंग भालेकर, शांताराम बापू भालेकर, धनंजय वर्नेकर, अस्मिता भालेकर, कविता हिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

निगडी चिखली मंडलाच्या रविवारी केलेल्या नियुक्त्यांमध्ये गिरिश देशमुख यांची युवा मोर्चा मंडल अध्यक्षपदी निवड केलेली आहे. उपाध्यक्षपदी रवी पाटोळे, अनिल वाणी यांचा समावेश आहे. मंडलाच्या कामगार आघाडीपदी धनाजी मोरे, सरचिटणीसपदी चंद्रकांत शेडगे, प्रभाग अध्यक्षपदी रवींद्र कुकडे, उपाध्यक्षपदी अभिजीत जोशी, तर सरचिटणीस म्हणून सागर देसाई यांची नियुक्ति करण्यात आली आहे.

याशिवाय मनीष चुडासमान यांची उपाध्यक्षपदी तर गोरख पाटील, अजिंक्य नलावडे , हरजीत बारडा यांची सरचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे. मंडलाच्या चिटणीसपदी गणेश अवघडे आणि गणेश नागवडे यांची निवड करण्यात आली आहे. प्रभाग उपाध्यक्षपदी सुधीर कांबळे, सदस्य मंडल पदी सुनील कांबळे, उपाध्यक्षपदी दिलीप पवार तसेच ओबीसी मोर्चा अध्यक्षपदी संतोष लष्करे यांची निवड करण्यात आली आहे. मंडलाच्या प्रसिद्धी प्रमुखपदी राकेश बावणे, उत्तर भारतीय आघाडीपदी कुंदन कुमार सिंह, उपाध्यक्षपदी प्रशांत कदम, चिटणीसपदी संतोष निकाळजे आणि सोमनाथ बिरजे यांची निवड केली आहे. सोमनाथ मेमाणे यांची प्रभाग 12 मध्ये अध्यक्षपदी, तर उपाध्यक्षपदी शिरीष उत्तेकर बापू मारणे यांची निवड करण्यात आली आहे.मनोज भालेकर हे सरचिटणीस म्हणून काम पाहणार आहेत.

> " भारतीय जनता पार्टी ही संघटनात्मक पद्धतीने काम करते. सूक्ष्म नियोजन करून मंडल पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा आमचा प्रयत्न असतो. या माध्यमातून पक्षाची ध्येय धोरणे नागरिकांपर्यंत पोहोचतात. नागरिकांच्या समस्या जाणून घेता येतात. यातून संवाद घडतो. या दृष्टीने या सर्व मंडल पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. या मंडल पदाधिकाऱ्यांनी पक्षाची ध्येय धोरणे जनमानसात पोहोचावी अशा सूचना या पदाधिकाऱ्यांना केल्या आहेत. एकजुटीने, एक दिलाने भाजपासाठी प्रत्येकजण काम करणार आहे. प्रथम राष्ट्र, मग देश आणि नंतर आपण या धोरणानुसार झोकून देऊन पक्ष संघटना पक्ष मजबूत करायचा आहे, अशा सूचना या मंडल पदाधिकाऱ्यांना करण्यात आल्या आहेत.
>
> - महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, पिंपरी-चिंचवड.

# दोन नव्या मार्गांवर बससेवा सुरु केल्याने प्रवाशांना दिलासा

## आळंदी-राजगुरुनगर मार्ग केला सुरु : उपनगरासह ग्रामीण भागातील नागरिकांची गैरसोय टाळणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पीएमपीच्या दोन नव्या मार्गांमुळे प्रवाशांच्या मागणीवरून पीएमपीएमएल प्रशासनाच्या वतीने ही सेवा सुरू केली आहे. दरम्यान, ग्रामीण भागाप्रमाणेच शहरातील उपनगरातही प्रवाशांना त्यांचा फायदा होणार आहे. राजगुरुनगर ते पुणे स्टेशन आणि कोथरूड ते आळंदी या दोन मार्गावर बससेवा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांची होणारी गैरसोय टळली आहे.



राजगुरुनगर येथून पुण्यात येणाऱ्या प्रवाशांची मोठी संख्या आहे. या मार्गावर असणाऱ्या बसची संख्या कमी असल्याने विद्यार्थी, नोकरदार यांना गैरसोयीचा सामना करावा लागत होता. त्यामुळे या मार्गावर स्वतंत्र बस सेवा सुरू करावी अशी मागणी प्रवाशांची होती. त्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. या वरून पीएमपीएमएल प्रशासनाने बस मार्ग सुरू करण्याचा निर्णय घेतला. दोन बस आठ फेऱ्यांमध्ये धावणार आहेत. राजगुरुनगर लॉ कॉलेज येथून सकाळी सात, साडेसात वाजता, दुपारी तीन वाजून २० मिनिटे, आणि चार वाजून १० मिनिटांनी बस सुटणार आहे, तर पुणे स्टेशन येथून सकाळी साडेनऊ वाजता, साडेदहा वाजता आणि सायंकाळी साडेपाच, साडेसहा वाजता ही बस असणार आहे. त्याचप्रमाणे बस क्रमांक २१९ बस कोथरूड ते आळंदी या नव्या मार्गाची सुरुवात करण्यात आली.

यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील विश्रांतवाडी, दिघी, थोरल्या पादुका मंदिर, देहूरोड, आळंदी या टप्प्यातील नागरिकांना या बसचा फायदा होईल. गेल्या अनेक दिवसांपासून या मार्गाची मागणी करण्यात आली होती. सकाळी दोन वेगवेगळ्या वेळी ही बस मार्गस्थ होईल. दरम्यान, यामुळे सकाळी पुण्यात जाणारे कामगार, विद्यार्थी आणि वारकऱ्यांना देखील याचा फायदा होणार आहे.

### निगडीतील तो मार्ग अखेर बंद

» पिंपरी-चिंचवड शहरातील ऐतिहासिक, प्रेक्षणीय आणि धार्मिक स्थळांची सफर नागरिक, पर्यटकांना घडवण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून 'पिंपरी-चिंचवड दर्शन' ही बससेवा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, पर्यटन बससेवेकडे पर्यटकांनी पाठ फिरवली आहे. सप्टेंबर महिन्यात केवळ २२ प्रवाशांची नोंद आहे. ही बस देहू, आळंदी आणि प्रतिशिर्डी या मार्गावर धावली. अखेर निगडीवरून सुटणारी बस बंद करण्यात आली आहे. निगडी डेपोवरून ही पर्यटन बस सुरू केली होती. दर शनिवारी आणि रविवारी ही बस देहू, आळंदी आणि प्रतिशिर्डी शिरगाव या ठिकाणी रवाना होत असत. त्यासाठी ३५ प्रवाशांची अपेक्षा होती. मात्र निगडीवरून प्रवाशांचा प्रतिसाद न मिळाल्याने ही बससेवा बंद करण्यात आली आहे.

> " राजगुरुनगर येथून पुणे स्टेशन मार्गावर बस सुरू करण्याची प्रवाशांची मागणी होती. त्यानुसार हा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. दोन बस आठ फेऱ्यांमध्ये धावणार आहेत.
>
> - विजयकुमार मदगे, आगार व्यवस्थापक, भोसरी.

# दिवाळीआधी हवाई प्रवाशांना खुशखबर!

## पुणे-भोपाळ दररोज थेट विमानसेवा तर इंदोर, चेन्नई अन् रायपूरसाठीही उड्डाण

**पुणे | प्रतिनिधी**

इंडिगो या प्रवासी विमान कंपनीने पुणे आणि भोपाळ ही थेट विमानसेवा सुरू करण्याची घोषणा केली आहे. या नवीन मार्गामुळे पर्यटनाबरोबरच या दोन शहरांमधील व्यापारालाही देखील प्रोत्साहन मिळेल. ही सेवा २७ ऑक्टोबरपासून दररोज सुरू होईल. याचबरोबर कंपनी पुण्याहून इंदोर, चेन्नई आणि रायपूर या मार्गावरही इंडिगो दिवाळीच्या आधी विमानसेवा सुरू करणार आहे.




विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाणारे पुणे हे महाराष्ट्रातील महत्वाचे शहर आहे. येथील शैक्षणिक संस्था आणि सांस्कृतिक वारसा ही पुण्याची ओळख आहे. परंपरा आणि आधुनिकता या दोन्हीचा मिलाफ घडवणाऱ्या पुण्यात सुंदर उद्याने, ऐतिहासिक वास्तू तसेच खाद्य-रसिकांसाठी अनेक पर्याय आहेत. पुणे हे माहिती तंत्रज्ञान (आयटी) केंद्र आहे. त्यामुळे देशभरातून तरुण नोकरीसाठी येथे येतात. देशातील वाहननिर्मिती उद्योगाचे पुणे एक मुख्य केंद्र आहे. अनेक आघाडीच्या वाहन निर्मिती कंपन्या आणि त्याच्याशी संबंधित उद्योग येथे आहेत.

भोपाळ ही मध्य प्रदेशची राजधानी असून इतिहास आणि नैसर्गिक सौंदर्य यांचा अनोखा संगम तेथे झालेला दिसतो. 'तलावांचे शहर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भोपाळमध्ये अनेक सुंदर तलाव आणि उद्याने आहेत. सांस्कृतिक वैविध्याच्या बाबतीत भोपाळ समृद्ध आहे. येथे ताज-उल्-मस्जिद आणि भारत भवन सारखे अप्रतिम वास्तूकलेचे नमुने बघायला मिळतात. त्यामुळे इतिहास आणि वास्तूकलेमध्ये स्वारस्य असणाऱ्यांसाठी भोपाळ एक आवडते डेस्टिनेशन आहे.

याबाबत इंडिगोचे जागतिक विक्रीप्रमुख विनय मल्होत्रा म्हणाले की, भोपाळ आणि पुणे या शहरांमध्ये २७ ऑक्टोबरपासून दररोज थेट उड्डाणे सुरू करताना आम्हाला आनंद होत आहे. ही नवीन उड्डाणे दोन राज्यांना जोडण्याचे महत्त्वाचे काम करतील. आम्ही नवनवीन मार्गांवर उड्डाणे सुरू करण्यास कटिबद्ध आहोत. ग्राहकांना HTTP://WWW.GOINDIGO.IN या आमच्या अधिकृत संकेतस्थळावरून तिकिटांचे आरक्षण करता येईल.

**पुणे-भोपाळ दैनंदिन विमानसेवा**

- पुण्याहून उड्डाण - दुपारी १ वाजता
- भोपाळमध्ये आगमन - दुपारी २:३५ वाजता
- भोपाळमधून उड्डाण - दुपारी ३:०५ वाजता
- पुण्यात आगमन - दुपारी ४: ५० वाजता

# वाढत्या अतिक्रमणाचा नागरिकांना ताप

## शहरातील मध्यवर्ती पेठांसह अनेक भागातील वास्तव : विभागातील निरीक्षकांच्या दर तीन महिन्याला होणार बदल्या

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील मध्यवर्ती पेठांसह, बाजारपेठेशिवाय इतर रस्त्यांवर अतिक्रमणे वाढली आहेत. त्यावर महापालिकेने कारवाईचे नियोजन केले होते. मात्र, प्रभावी कारवाई न झाल्यामुळे शहरातील अतिक्रमणाचा फास सुटू शकलेला नाही. याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना सहन करावा लागत आहे.

शहरातील रस्त्यांवरील पदपथांवर हातगाड्या लावल्या जात आहेत. नागरिकांना चालण्यासाठी पदपथ शिल्लक राहिलेले नाहीत. गणपती उत्सव पार पडल्यानंतर नवरात्रोत्सव सुरू झाला आहे. त्यानंतर दसरा आणि दिवाळी हे मोठे सण पार पडणार आहेत. या सणानिमित्ताने खरेदीसाठी नागरिकांची झुंबड पडत असते. सणासुदीला विविध वस्तूंच्या विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात वस्तूंचे स्टॉल लावले जात आहेत. आताच रस्त्यावर वाढलेले अतिक्रमण पाहता या सणानिमित्ताने त्यात आणखी भर पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेने वेळीच अतिक्रमण विरोधी कारवाई करून नागरिकांना चालण्यासाठी पदपथ आणि सुरळीत वाहतुकीसाठी रस्ते मोकळे करून देण्याची आवश्यकता आहे. अन्यथा पुणेकरांना वाहतूक कोंडीचा सामना करावाच लागणार आहे.



दरम्यान, महापालिका अधिकाऱ्यांना वारंवार अतिक्रमणाची माहिती देऊनसुद्धा कारवाई होत नाही, अशा तक्रारी भाजपच्या माजी नगरसेवकांनी सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पालिकेत घेतलेल्या बैठकीत केल्या होत्या. त्यावर "अतिक्रमण कारवाई करताना कोणत्याही राजकीय पदाधिकाऱ्याचा फोन आला, तरी त्यांचे ऐकू नका. रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यास प्राधान्य द्या, तत्काळ कारवाई करा," असे आदेश केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी महापालिका प्रशासनाला दिले होते. त्यानंतर महापालिकेच्या अतिक्रमण कारवाईचे नियोजन केले होते. तसा आराखडा तयारदेखील केला होता. परंतु हा आराखडा लिक झाला. त्यामुळे कारवाई कितपत यशस्वी होणार, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता.

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर पुणे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना निवडणुकीची कामे देण्यात आली होती. अतिक्रमण विभागाचे अनेक कर्मचारी मिळकत कर वसुलीसाठीच्या कामात गुंतले होते. कर्मचाऱ्यांच्या अभावी अतिक्रण विभागाकडून शहरात होणारी कारवाई थंडावली होती.

> शहराला अतिक्रमणमुक्त करण्यासाठी महापालिकेकडून नियोजन करण्यात आले आहे. अतिक्रमण निरीक्षकांच्या बदल्या दर तीन महिन्याला केल्या जाणार आहेत. तसेच यासाठी महापालिकेकडून एक ॲप तयार केले जाणार आहे. त्यामध्ये निरीक्षकांची माहिती दिली जाईल. मुंबईच्या धर्तीवर पुण्यात तशी व्यवस्था तयार केली जाणार आहे.
>
> **- डॉ. राजेंद्र भोसले, आयुक्त, पुणे महापालिका.**

याचा फायदा घेत मुख्य शहरातील रस्त्यांसह उपनगर भागातील रस्त्यांवर अतिक्रमण वाढले आहे. यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. राजकीय दबावामुळे अतिक्रमण कारवाईकडे दुर्लक्ष केले जात होते. मात्र अतिक्रमण वाढत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. रस्ते अरुंद होत असल्याने वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात होती. त्याची दखल घेत महापालिकेने कारवाईचे नियोजन केले असून शहरातील पाच झोनमध्ये कारवाई करण्याचे नियोजन करण्यात आले होते. परंतु आता पुन्हा अवघ्या चार ते पाच दिवसात विधानसभेची आचारसंहिता लागू होणार आहे. विधानसभेच्या कामासाठी महापालिकेचे कर्मचारी दिले जाणार आहेत. त्यामुळे आता अतिक्रमण निरीक्षकांच्या बदल्या करूनही अतिक्रमण कारवाई प्रभावी ठरणार का, असा सवाल या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.